जाहिरात क्र. ------, दि.

# पुणे महानगरपालिका
## जाहिरात प्रकटन

आरोग्य कार्यालयाअंतर्गत खालील अस्थायी पदावर सहा महिने करिता, करार पद्धतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकुण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | फिजिशियन | २,२५,००० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी. (मेडिसीन) किंवा डी.एन.बी. (मेडिसीन) | अनुभव असल्यास प्राधान्य | १८ |
| २. | इन्टेसिव्हिस्ट | २,२५,००० | एम.डी. (मेडिसीन) /डी.एन.बी. (मेडिसीन) /अॅनेस्थेशिया/ pulmonary मेडिसीन व क्रिटीकल केअर fellowship. डिप्लोमा | अनुभव असल्यास प्राधान्य | ०७ |
| ३. | आय.सी.यु. फिजिशियन | २,२५,००० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी. (मेडिसीन) किंवा डी.एन.बी. (मेडिसीन) एम.डी. अॅनेस्थेशिया व आय.डी.सी.सी.एम. कोर्स किंवा एम.डी. (चेस्ट) व आय.डी.सी.सी.एम. कोर्स | अनुभव असल्यास प्राधान्य | ०९ |
| ४. | पेडीयाट्रिशियन | २,२५,००० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी./डी.एन.बी. पेडीयाट्रिक्स | अनुभव असल्यास प्राधान्य | ०७ |
| ५. | निवासी भुलतज्ञ/ एम.डी. मेडिसीन/ चेस्ट टी.बी. | ८१,२५० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी./डी.एन.बी./ डी.ए. | अनुभव असल्यास प्राधान्य | २० |
| ६. | निवासी पेडीयाट्रिशियन | ८१,२५० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी./डी.एन.बी./डी.सी.एच. passed/appearing | अनुभव असल्यास प्राधान्य | ०८ |
| ७. | निवासी वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) | ६०,००० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस ही पदवी उत्तीर्ण. महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलकडील नोंदणी बंधनकारक | अनुभव असल्यास प्राधान्य | ३४ |
| ८. | वैद्यकीय अधिकारी (कोविड १९ आयुष प्रमाणपत्रधारक) | ३५,००० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.एच.एम.एस./ बी.यु.एम.एस. ही पदवी उत्तीर्ण.<br>२. संबंधित महाराष्ट्र कौन्सिल कडील अद्यावत नोंदणी बंधनकारक.<br>३. संबंधित महाराष्ट्र कौन्सिल कडील कोविड १९ आयुष प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. | अनुभव असल्यास प्राधान्य | ३९ |
| ९. | स्टाफनर्स | २२,३४९ | बी.एस.सी./एम.एस.सी. नर्सिंग/ बी.पी.एन.ए./ आर.जी.एन.एम. कोर्स पूर्ण असणे आवश्यक.<br>ब) महाराष्ट्र स्टेट नर्सिंग कौन्सील यांचेकडील नोंदणी बंधनकारक | अनुभव असल्यास प्राधान्य | ३० |

अटी – १. वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव असल्यास प्राधान्य. २. सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरूपाचे आहे. ३. सदर पदाच्या नेमणुका objective assesment पद्धतीने करण्यात येईल. ४. उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रांसह हजर राहणे आवश्यक आहे. ५. उमेदवारांनी एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. ६. अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शाळांत परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक. ७. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करून कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा. ८. अर्जदार महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे (शासनमान्य). ९. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय शैक्षणिक अर्हता गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इ. संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती (झु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. १०. निवड झालेल्या उमेदवारांना विहित नमुन्यात करारनामा करून फक्त ६ महिन्यांकरिता नेमणूक दिली जाईल. ११. येणाऱ्या उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. १२. वरील पद हे अस्थायी स्वरूपाचे असल्याने या पदावर कायमस्वरूपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. १३. वरील पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहील. १४. सदर पदांना दररोज ८ तास (रुग्णालयाच्या सोयीनुसार) सेवा देणे बंधनकारक असेल तथापी पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकारी खातेप्रमुख यांचे असतील. १५. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. १६. बोलविलेल्या उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकारी मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १७. रिक्त पदांच्या संख्येत कमी/ जास्त बादल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. पदांची संख्या समांतर आरक्षण या बाबत बदल करणे, मुलाखत स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे या बाबतचे सर्व अधिकारी मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे स्वतःकडे राखून ठेवतील. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १८. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

वरील प्रमाणे नमूद केलेली शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या व अनुभवधारक उमेदवारांनी, दि.०४/०८/२०२० रोजी पासून आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी व गुरुवारी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, आरोग्य कार्यालय, तिसरा मजला, पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे – ४११००५ येथे विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सह उपस्थित राहावे. उमेदवाराने सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे अथवा कार्यालयामार्फत देण्यात येईल.

(डॉ. रामचंद्र हंकारे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका